# IN THE MAHARASHTRA ADMINISTRATIVE TRIBUNAL, MUMBAI BENCH

DISTRICT: NASHIK

Rajendrasing Shankarsing Pardeshi ... Applicant

Versus

Director General of Police
Maharashtra ... Respondent

## INDEX



| Sr. No | Particular | Page No |
|---|---|---|
| 1 | Synopsis | A - B |
| 2 | Petition | 1 - 7 |
| 3 | Annexure A | 8 – 11 |
| 4 | Annexure B | 12 - 18 |
| 5 | Annexure C | 19 – 20 |
| 6 | Annexure D | 21 - 24 |
| 7 | Annexure E | 25 - 26 |
| 8 | Annexure F | 27 |
| 9 | Vakalatnama | 28 |

# IN THE MAHARASHTRA ADMINISTRATIVE TRIBUNAL, MUMBAI BENCH

DISTRICT: NASHIK

Rajendrasing Shankarsing Pardeshi Applicant

Versus

Director General of Police
Maharashtra Respondent

## SYNOPSIS

**The applicant is Ex. Police Inspector of Maharashtra State retired from Jalgaon as on 31 May, 2020 after completing of 36 years of service. On 28 Jan 2020 Respondent start the departmental enquiry against the applicant regarding the incidence of 2018 which was false and frivolous. Applicant challenged the punishment order in the court of Additional Chief Secretary, Home Department and after hearing both the side applicant was acquitted. During the mean time applicant was retired and he get his financial obligation gratuity, PF etc. delayed by almost 2 years. Hence applicant apply for interest on delayed payment but his application was rejected hence applicant have no option to file this petition.**

## DATES AND EVENTS

| Sr. No | Date | Events |
|---|---|---|
| 1 | 26 Sept, 2011 | Applicant was promoted as API |
| 2 | 01 Aug, 2018 | Applicant was promoted as Police Inspector |
| 3 | 28 Jan, 2020 | False Departmental Enquiry Initiated against Applicant. |
| 4 | 31 Dec, 2021 | Punishment Order passes against applicant. |
| 5 | Jan, 2021 | Applicant filled the Appeal against the above |

B

| | | |
|---|---|---|
| | | **order to Home Department Mumbai** |
| **6** | **28 June, 2022** | **The appeal is decided in favour of the applicant.** |
| **7** | **22 April, 2022** | **Applicant received the payment of 10 months leave salary encashment.** |
| **8** | **23 May, 2022** | **Applicant received the payment of Gratuity.** |
| **9** | **15 June, 2022** | **Applicant received the payment for pension encashment.** |
| **10** | **1 Jan, 2022** | **Applicant received the lump sum payment of earlier 10 month salary which was on hold from March, 2021** |

**Manoj Suresh Pingale**
**Advocate**
**10, Shrihari Tower,**
**Holaram Colony, Nashik.**

# IN THE MAHARASHTRA ADMINISTRATIVE TRIBUNAL, MUMBAI BENCH

DISTRICT: NASHIK

Rajendrasing Shankarsing Pardeshi Applicant

Versus

Director General of Police
Maharashtra Respondent

**DETAILS OF APPLICATION:**

1. **Particular of the applicant:**
   - i) Name of the Applicant : Rajendrasing Shankarsing Pardeshi
   - ii) Name of Father : Shankarsing Pardeshi
   - iii) Age of Applicant : 62
   - iv) Designation and particular of office: Retd. Police Inspector
   - v) Office Address : NA
   - vi) Address for service of Notice : R.B. Type 2 / 6, Police Officer Colony, Snehbandhan Park, Sharanpur Road, Nashik 422002

2. **Particulars of the respondent**
   - i) Name of the respondent : Director General of Police
   - ii) Designation and particular of office: Lion Gate, Fort, Mumbai, Maharashtra 400001
   - iii) Office Address : As above
   - iv) Address for service of notices: As above

3. **Particular of the order against which application is made :**

आदेश क्र विप्रव्या ०४२३ / प्र क्र १३३ / आस्था १ . दि २ मे २०२३

**4. Jurisdiction of the Tribunal**

The applicant declares that the subject of the order against which he want redressal is within the jurisdiction of the Tribunal.

**5. Limitation**

The applicant further declares that the application is within the limitation prescribed in section 21 of the Administrative Act, 1895.

**6. Fact of the case :**

The facts of the case are given below:-

i) The applicant joined the Police Force on 09 August, 1984 as a recruit Police Constable and during his entire service of 36 years he got 6 promotions and 300 rewards.

ii) During the year 2016-2018 applicant was posted as Police Inspector to Anti Corruption Department Nashik. During this tenure the Superintendent of Police levied a false charges of corruption against the applicant and without any preliminary enquiry submit his report to higher authority. **(Annexure A )**

iii) Considering this report before the 4 months of the retirement the department enquiry was initiated against the applicant. The enquiry deliberately delayed for 2 years and after 2 years the enquiry report was submitted on 15 Sept 2021.

iv) Considering the above report which was submitted on 15 Sept, 2021 respondent passed the punishment order against the applicant as on 31 Dec, 2021.

v) Aggrieved applicant filled the appeal petition to Additional Secretary Home Department Maharashtra against the punishment order passed against him.

LAXMAN F. LANDGE NASHIK NOTARY GOVT. OF INDIA Regd. No. 1228 Valid upto 03-04-2026

vi) After due verification of the applicant petition and the submission of the respondent the Home Dept. Maharashtra acquittal the applicant without any charge and without any adverse remarks as on 28 June, 2022. **(Annexure B )**

vii) The applicant was retired from his successful tenure of 36 years as on 31 May, 2020. The applicant supposed to receive his gratuity and other retirement monitory benefits during the stipulated time but respondent delayed such payments approximately 2 years. (which was exactly shown on the table attached below)

| Sr. No | Date | Details of Amount | Late Period | Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | 22/4/2022 | 10 month leave salary encashment | 24 months | 7,96,070 |
| 2 | 30/05/2022 | Gratuity | 24 months | 11,23,650 |
| 3 | 15/6/2022 | Pension encashment | 24 months | 13,68,157 |
| 4 | 9/11/2020 | Provident Fund | 5 months | 38,37,979 |
| 5 | January 2022 | monthly salary of 10 months | 10 months | 4,09,625 |
| | | | **Total** | **75,36,191** |

viii) The applicant applied to respondent for the interest payment on delayed compensation ,but respondent refuses the application with the reason that due to pending enquiry against the applicant the payment was delayed. **(Annexure C )**

ix) The applicant states that due to the false enquiry and the internal politics of the department applicant was deliberately framed in departmental enquiry with the intention that the applicant not able to get timely promotion and monitory benefit after the retirement. Due to the grace of god and applicants spotless service record govt. passed the order in favor of the applicant and denied all the allegations made against the applicant.

x) The applicant entitled to get the interest on delayed payment received to him which is retirement benefits and right of every retired person to get his monetary benefit within the time because after the retirement this monetary benefit received is used as a support stick for retired person and this is used as a cushion for his family's future life, e.g. Education of children's, marriage of daughter, medical emergency etc. if this money not received within the time then it is useless.

xi) Applicant also get a travelling expanses for his duty posted at Nagpur for winter Assembly session 2019 also at Bhusaval for Ganapati festival police duty, and travelling expanses of Shirdi police duty. The Applicant apply to get this travelling expanses **(Annex D )** then respondent asked a reply from superintendent of police –Jalgaon but still that bill is pending with respondent.

xii) Applicant also not get the amount of Rs.30000/ which applicant eligible to get after retirement for transport charges for carry the belongings and furniture to home district.

xiii) Through this petition applicant apply for interest @10% p.a. for his delayed payment received from respondent.

LAXMAN F. LANDGE NASHIK
NOTARY GOVT. OF INDIA
R.No. 1228
Valid upto 03-04-2026

7. **Details of the remedies exhausted:**

The applicant declares that he has availed of all the remedies available to him under the relevant service rules as on 16 April, 2024. The applicant requested for interest on delayed payment to respondent in response to that on 2 May, 2023 Govt. of Maharashtra issued direction आदेश क्र वि प्र व्या ०४२३ / प्र. क्र. १३३ / आस्था -१ दि २ मे २०२३ **(Annexure E)** to respondent regarding the proper procedure for filling such proposal but without any special care the respondent forwarded the proposal to the Govt. and Govt. rejected the applicants plea to get the interest on payment as on 27 Dec, 2023 vide order no आदेश क्र वि प्र व्या ०४२३ / प्र. क्र. १३३ / आस्था -१ दि २७ डिसेंबर २०२३.

8. **Matters not previously filed or pending with any other court :**

The applicant further declares that he had not previously filed any application, writ petition or suit regarding the matter in respect of which this application has been made, before any court or any other authority or any other Bench of the Tribunal nor any such application, writ petition or suit is pending before any of them.

9. **Relief sough :**

In view of the fact mentioned in para no 6 above, the applicant prays for following relief.

i) Applicant get 10 % interest on delayed payment of leave encashment monetary benefit of Rs. 7,96,000/- (Seven Lac Ninety Six Thousand )

ii) The applicant get 10% interest on gratuity of Rs. 11, 23, 650/- (Eleven Lac Twenty Three Thousand and Six Hundred Fifty Rupees only) which was delayed by 24 months.

iii) The applicant get 10% interest on pension encashment of Rs. 13, 68,157/- (Thirteen Lac Sixty Eight Thousand One Hundred Fifty Seven Only) which was delayed by 24 months.

iv) The Applicant pray for his pending travelling bill along with interest and Rs. 30000/ transport expanses which he eligible to get after retirement.

v) The applicant get 10% interest on salary of previous 10 months which was hold by the respondent. (The interest calculation should be made on actual late day's basis.)

**10. Particulars of fees in respect to application.**

Paid through online mode.

**11. List of Enclosures:**

1) **Anti-Corruption Bureau false enquiry.**
2) **Punishment Order passed. (Appeal)**
3) **Acquittal Order passed by Addl. Secretary.**
4) **Interest Payment letter refused by Respondent**
5) **Bank Statement**

**12. Acts to be relied upon :**

1) Maharashtra Civil Services Act (Retirement Benefits) -1982

LAXMAN F. LANDGE
NOTARY
GOVT. OF INDIA
R.No. 1228
Valid upto
03-04-2026
NASHIK

Signature of the Applicant

Manoj Suresh Pingale
Advocate
10, Shrihari Tower,
Holaram Colony, Nashik.

# Verification

I Rajendrasing Pardeshi S/o, Shankarsing Pardeshi age 62 working as Retired Police Inspector in the office of Jalgaon Police, resident of R.B. Type 2 / 6, Police Officer Colony, Snehbandhan Park, Sharanpur Road, Nashik 422002, hereby verify that the contents of paras 1 to 11 are true to my personal knowledge and paras1 to 11 believed to be true on legal advice and that I have not suppressed any material fact.

Date:.....................

Place:...................

Signature of the applicant

IDENTIFIED-BY ME

To, The Registrar,

BEFORE ME

L. F. LANDGE
Advocate & Notary
Govt. of India
Stadium Complex, Building No.2,
M.G.Road, Nashik-1.
Mob.: 9823060198

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

LAXMAN F. LANDGE NOTARY GOVT. OF INDIA R.No. 1228 Valid upto 03-04-2026 NASHIK

Noted & Registered at Serial Number

THIS DOCUMENT CONTAINS PAGES

Dt.:

क्र.पोमसं/११/२२/६-विचौ/१५१/२०१८
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय**
शहीद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई ४०० ००१
दिनांक :- ३१ /१२/२०२१.

संदर्भ :- १. या कार्यालयाचे आदेश क्र. पोमसं/११/२२/६-विचौ/१५१/२०१८, दि. २८/०१/२०२० चे विभागीय चौकशीचे आदेश.
२. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांचे पत्र क्र. लाप्रवि/नापना/कसुरी/माळी व परदेशी/२०२०/४१८४, दि. १५/०९/२०२१.
३. या कार्यालयाची समक्रमांकित दि. ०७/१०/२०२१ ची कारणे दाखवा नोटीस.
४. सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी यांनी सादर केलेले दि. २४/११/२०२१ चे अभिवेदन.

विषय :- विभागीय चौकशीबाबत.
पोलीस निरीक्षक शत्रुघ्न देविदास माळी सध्या नेमणूक नवी मुंबई.
पोलीस निरीक्षक राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी सध्या सेवानिवृत्त नेमणूक जळगांव
दोघेही तत्कालीन नेमणूक अे.सी.बी. घटक धुळे.

* * * * *

-:अंतिम आदेश:-

पोलीस निरीक्षक शत्रुघ्न देविदास माळी व पोलीस निरीक्षक राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी (सध्या सेवानिवृत्त) हे दोघेही तत्का. नेम. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे घटक येथे कार्यरत असतांना त्यांनी केलेल्या कुसरीबाबत या कार्यालयाचे आदेश क्र. पोमसं/११/२२/६-विचौ/१५१/२०१८, दि. २८/०१/२०२० अन्वये विभागीय चौकशी आदेशित करुन चौकशी करण्यासाठी पोलीस अधिक्षक, लाचलुचत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांची विभागीय चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. पोलीस निरीक्षक शत्रुघ्न देविदास माळी व पोलीस निरीक्षक राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी (सेवानिवृत्त) यांच्याविरुध्द विभागीय चौकशीत पुढीलप्रमाणे दोषारोप ठेवण्यात आले आहेत:-

**पोलीस निरीक्षक शत्रुघ्न देविदास माळी (तत्का. पोउपअधि एटप), यांचेविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप :-**

१. तक्रारदार श्री.अरविंद लक्ष्मण वाकेकर यांनी दि.०२/०६/२०१८ रोजी तुमच्या विरुध्द अे.सी.बी.कडे तक्रार अर्ज दिला. त्यावरुन तक्रारदार यांची पत्नी श्रीमती संघमित्रा बाविस्कर (वाकेकर), नायब तहसिलदार, निफाड यांच्याविरुध्द रेकॉर्डिंग आहे ते मिटवावयाचे असेल तर, श्री. सुदाम महाजन (तहसिलदार दोंडाईचा) यांचे मार्फतीने सौ. देवरे तहसिलदार, मालेगांव यांना तक्रारदार यांचे पत्नीस स्वत:चा आर्थीक फायदा करुन घेण्याच्या हेतुने पोलीस निरीक्षक माळी यांनी निरोप देण्यास सांगितले व कर्तव्यात विपर्यस्त वर्तन केले.

२. तत्का.पोलीस उप अधीक्षक (एटप) शत्रुघ्न देविदास माळी यांनी श्री.सुदाम महाजन, तहसिलदार यांच्या मार्फतीने तक्रारदार श्री.अरविंद लक्ष्मण वाकेकर यांच्याकडून दहा लाखांची मागणी केली व पोलीस निरीक्षक राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी तत्का.नेमणूक असेबी, नाशिक यांना सदरच्या रक्कमेबाबत तक्रारदार श्री.वाकेकर यांना भेटण्यास सांगितले व कर्तव्यपरायणता न ठेवता विपर्यस्त वर्तन केले.

३. तत्का.पोलीस उप अधीक्षक (एटप) शत्रुघ्न देविदास माळी यांनी त्यांचे स्वत:चे मो.क्र. ९८९२७७१७७२ वरुन पुढील प्रमाणे आर्थीक फायदा होण्यासाठी संपर्क करुन पदाचा गैरवापर केला व कर्तव्यात विपर्यस्त वर्तन केल्याचे सिध्द होत आहे.

| अ. क्र. | मोबाईल क्र. | मोबाईल धारकाचे नाव | संभाषण तारीख | एकूण किती वेळा संभाषण झाले |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | ९६२३२८९७९३ | सौ.संघमित्रा बाविस्कर, निवासी नायब तहसिलदार, निफाड. | दि.३०/०५/२०१८ | १ वेळा |
| २. | ९०७५०१३४७६ | सौ.देवरे तहसिलदार, मालेगांव. | दि.०१/०३/२०१८ ते दि.२२/०५/२०१८ | ८२ वेळा |
| ३. | ८८८८८७२९२९ | पो.नि.आर्.एस्.परदेशी, लाप्रवि नाशिक. | दि.३०/०५/२०१८, दि.०१/०६/२०१८ व दि.०५/०६/२०१८ या कालावधीत | ०७ वेळा |
| ४. | ९४२१६५५६७३ | श्री.सुदाम महाजन, तहसिलदार, शिंदखेडा, जि.धुळे. | दि.०१/०३/२०१८ ते दि.०४/०६/२०१८ या कालावधीत | ११७ वेळा |

४. तक्रारदार श्री.वाकेकर हे तत्का.पोलीस उप अधीक्षक (एटप) शत्रुघ्न देविदास माळी यांना दि.३०/०५/२०१८ रोजी भेटले असता, त्याच दिवशी पो.नि.माळी यांनी पोलीस निरीक्षक परदेशी, श्रीमती संघमित्रा बाविस्कर, नायब तहसिलदार, निफाड यांना संपर्क केल्याचे स्पष्ट होत आहे. तदनंतर पो.नि.माळी यांनी तहसिलदार सुदाम महाजन व सौ.देवरे यांच्या संपर्कात राहून स्वत:चा आर्थीक फायदा करुन घेण्याच्या हेतुनेच जास्तीत जास्त सपंर्कात राहून विपर्यस्त वर्तन केले आहे.

<u>पोलीस निरीक्षक राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी यांच्याविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप :-</u>

१. तुम्ही दि.०५/०६/२०१८ रोजी हॉटेल इमरॉल्ड पार्क नाशिक येथील तळमजल्यावरील रेस्टारंट मध्ये तक्रारदार श्री.वाकेकर व त्यांचे मित्र श्री.बोडके यांच्यासोबत आर्थिक व्यवहाराबावत तत्का.पोलीस उप अधीक्षक (एटप) शत्रुघ्न देविदास माळी यांचेमार्फत मध्यस्थी म्हणून तक्रारदाराची भेट घेतली. भेटी दरम्यान "मी काय म्हणतो मी डिस्काउंट करुन देतो, त्यांनी पंधरा (१५) सांगितले तर मी तेरा (१३) करुन देतो, त्यांनी दहा (१०) सांगितले तर मी आठ (०८) करुन देतो" असे आर्थीक व्यवहाराचे तक्रारदारासोबत संभाषण करुन कर्तव्यपरायणता न ठेवता कर्तव्याप्रती सचोटी ठेवली नाही.

२. तक्रारदार वाकेकर व तत्का.पोलीस उप अधीक्षक (एटप) शत्रुघ्न देविदास माळी यांची दि.३०/०५/२०१८ रोजी भेट झाल्यानंतर श्री.माळी यांचा मो.क्र.९८९२७७१७७२ यावर पोनि परदेशी यांनी आर्थीक मोबदला मिळावा या उद्देशाने जाणीवपूर्वक दि.३०/०५/२०१८, दि.०१/०६/२०१८, व दि.०५/०६/२०१८ या कालावधीत विशिष्ट हेतुने ७ वेळा संपर्क केल्याचे प्रकर्षाने दिसत आहे. पोलीस निरीक्षक परदेशी हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे कार्यरत असतांना अधिकाराचा गैरवापर करुन आर्थीक व्यवहाराची मध्यस्थी करणे हे संशयास्पद व आक्षेपार्ह असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यपद्धती व गरीमा लक्षात घेता पूर्णत: विसंगत व अशोभनिय आहे. तुम्ही पो.नि. शत्रुघ्न देविदास माळी व पो.नि. राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागात काम करतांना आपला आर्थिक फायदा करुन घेण्यासाठी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन संशयास्पद व आक्षेपार्ह वर्तन करुन कर्तव्यात गंभीर कसुरी केली आहे.

२. वर नमूद दोषारोपावरुन केलेल्या विभागीय चौकशीत सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी यांना चौकशी अधिकारी यांनी योग्य त्या सोई व सवलती दिल्या आहेत व चौकशी अधिकारी यांनी विभागीय चौकशी नियमानुसार पूर्ण करुन विभागीय चौकशी अहवाल (खंड १ ते ९) पुढील कार्यवाही करिता या

कार्यालयास पाठविला आहे.

३. चौकशी अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या समारोप अहवालात चौकशी अधिकाऱ्यांनी सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप, सिध्द होत असल्याचा निष्कर्ष नोंदविला आहे. तसेच प्राप्त विभागीय चौकशी अहवालाची कागदपत्रें तपासता सेनि पोनि परदेशी यांच्याविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द झाल्याने त्यांना संदर्भ क्र.३ अन्वये **"त्यांच्या निवृत्ती वेतनातून दरमहा रु. ५,०००/- (रु. पाच हजार फक्त) ०२ (दोन) वर्ष कपात का करण्यात येऊ नये"** या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. त्यास अनुसरुन सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक परदेशी यांनी संदर्भ क्र. ४ अन्वये त्यांनी त्यांचे अभिवेदन या कार्यालयास मुदतीत सादर केले असून, सदर अभिवेदनात त्यांनी पुढील मुद्दे उपस्थित केले आहे.

साक्षीदार श्रीमती संघमित्रा बाविस्कर नायक तहसिलदार निफाड भ्रमणध्वनी क्र. ९६२३२८९७९३ / ९८८१६९९७८६ व श्री गोरख बोडके जमीन वादावादी व्यवहाराचे दलाल (प्रॉपर्टी एजंट) इगतपुरी भ्रमणध्वनी क्र. ९९२२७५०५९९ हे मा. पंजाबराव उगले महोदयांना भेटल्यावर परदेशी साहेब हे आमचे ओळखीचे आहेत असे सांगितल्याने मा. श्री उगले महोदयांनी आम्हांस बोलावून तोंडी आदेशाद्वारे सांगितले की, हे माझे परिचित आहेत. श्री शत्रुघ्न माळी, तत्का. पोलीस उप अधिक्षक, लाप्रवि, धुळे यांचेशी फोनद्वारे संपर्क करुन व्यवहारात मदत करा, कोणते काम आहे ते सांगितले नाही. आम्ही ही वरिष्ठांचा आदेश असल्याने अविश्वास दाखविला नाही. व्यवहारात मदत करण्याच्या दृष्टीने त्यासंबंधी संभाषण केले.

नंतर श्रीमती संघमित्रा बाविस्कर नायब तहसिलदार निफाड यांनी आम्हांस सांगितले की, श्री शत्रुघ्न माळी, तत्का. पोलीस उप अधिक्षक, लाप्रवि, धुळे व श्री सुदाम महाजन तहसिलदार शिंदखेडा धुळे यांच्याविरुध्द माझे पती श्री अरविंद वाकेकर यांनी लाच मागणीची तक्रार दिली.

परंतु, श्री पंजाबराव उगले साहेब हे लाचेच्या तक्रारीत तुमचेही नाव समाविष्ठ करण्यास सांगत आहेत. आम्ही त्यांना सांगितले की, पोलीस निरीक्षक परदेशी साहेब हे इगतपुरीला आमच्या बरोबर होते. त्यांनी आमच्याकडे कधीही पैशांची मागणी केली नाही. आम्ही त्यांना जमिनीच्या व्यवहाराचे काम आहे, असे सांगितले आहे.

आमची तक्रार श्री शत्रुघ्न माळी, तत्का. पोलीस उप अधिक्षक, लाप्रवि, धुळे यांचेविरुध्द आहे. परदेशी यांच्याविरुध्द नाही. परंतु ते दबाव टाकत आहे. तरी तुम्ही सावध रहा. अशा प्रकारे षडयंत्राबाबत आम्हास समजल्यावर आम्ही मा. उगले महोदयांना कायदेशीर आदेश देणेसंबंधी दि. ०७/०६/२०१८ रोजी निवेदन दिले. मा. श्री कडासने महोदयांनी चौकशीतील दस्ताऐवज / नस्ती नकलांच्या छायांकित प्रती दिल्या. त्याप्रमाणे मा. श्री पंजाबराव उगले महोदयांनी ही निवेदनावर स्वाक्षरी करुन त्याची छायांकित प्रत आम्हास दिली.

सेवानिवृत्त राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी हे दि. ३१/०५/२०२० रोजी नियम वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असुन त्यांना प्रस्तावित केलेल्या ज्ञापनामध्ये नमूद केलेली शिक्षा त्यांना मान्य नाही. कारण आमचा काही एक संबंध नसल्याने आमच्याविरुध्द No Complaint, No Demand, No Accept असे असतांना आम्हास बचावाची संधी न देता फसवणूक करण्यात आली. आपण न्यायप्रिय असुन समक्ष चौकशी करुन न्याय द्याल ही अपेक्षा तसेच, सेवानिवृत्ती मासिक वेतन व उपदान देण्यासाठी संबंधीतांना आदेश होणेस विनंती केली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणी सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी यांना प्रस्तावित करण्यात आलेल्या शिक्षेला अनुसरुन त्यांनी सादर केलेले अभिवेदन सादर केले असून सदर अभिवेदनात त्यांनी त्यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप मान्य नाही असे नमूद केले आहेत.

५. एकंदरित वरील नमूद कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी यांनी दिलेले स्पष्टीकरण समाधानकारक नाही. विभागीय चौकशीमध्ये तक्रारदार यांना प्रत्यक्ष भेटले तसेच त्यांच्याशी फोनवरुन बोलण्याचे संभाषण हे रेकॉर्ड झालेले आहे. यावरुन सेवानिवृत्त परदेशी यांच्यावरील दोषारोप सिध्द झालेले आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता, **"सक्षम प्राधिकारी"** म्हणून महाराष्ट्र

पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २५ व महाराष्ट्र पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ मधील तरतुदीनुसार मला प्रदान असलेल्या अधिकारानुसार मी पुढील प्रमाणे ओदश देत आहे.

-: आदेश :-

मी. संजय पांडे, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई याद्वारे सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी यांना कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेली **"त्यांच्या निवृत्ती वेतनातून दरमहा रु. ५,०००/- (रु. पाच हजार फक्त) ०२ (दोन) वर्ष कपात करणे"** ही शिक्षा अंतिम आदेशात देत आहे.

उक्त कसुरदार हे सदर निर्णयाने व्यथित होत असतील तर, ते आदेश मिळालेल्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आंत योग्य मार्फतीने शासनास गृह विभागाकडे अपिल सादर करु शकतात.

(संजय पांडे)
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस निरीक्षक राजेंदसिंह शंकरसिंह परदेशी (सध्या सेवानिवृत्त)
तत्का. नेम. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे घटक.
**(मार्फत व प्रत:- पोलीस अधिक्षक, जळगांव.)**

# Annexure B



पो. म. सं. म. रा. मुंबई

- 1 JUL 2022

आवक क्रमांक

N· 6322

महाराष्ट्र शासन
गृह विभाग, मुख्य इमारत,
दुसरा मजला,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२ २२०४८३२५.                Email ID : deskpol6b.home.

क्र. पीडीई ०१२२ / प्र.क्र. ७४ / पोल – ६ ब,                दिनांक : २८.०६.२०२२

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय : **शिक्षेविरुध्द अपीलावरील सुनावणीचे आदेश.**
संदर्भ : क्र.पोमंस/११/२२/६-विचौ/१५१/२०१८ दिनांक ३१.१२.२०२१.

अपिलार्थी श्री. राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, नेमणूक जळगांव, तत्का. नेम. असीबी घटक-धुळे यांनी संदर्भिय आदेशाविरुध्द शासनाकडे दाखल केलेल्या अपील अर्जावर दिनांक १३.०५.२०२२ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामिण) यांचेसमोर सुनावणी संपन्न झाली. सदर सुनावणी अंती अपिलीय प्राधिकारी तथा मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामिण) यांनी दिलेल्या निर्णयाची प्रमाणित प्रत सोबत संलग्न केली आहे.

अपिलार्थी श्री. राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, नेमणूक जळगांव, तत्का. नेम. असीबी घटक-धुळे यांचे अपील अर्जासंदर्भात अपिलीय प्राधिकारी तथा मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामिण) यांनी दिलेल्या निर्णयाचे अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल शासनास विनाविलंब सादर करावा, ही विनंती.

सोबत :- वरीलप्रमाणे.

(उदय बा. काणणक)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) अपिलार्थी श्री. राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, नेमणूक जळगांव, तत्का. नेम. असीबी घटक-धुळे( पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत)
२) मा. राज्यमंत्री गृह ग्रामिण यांचे खाजगी सचिव.
३) निवडनस्ती पोल – ६ ब.

मा. राज्यमंत्री (गृह)(ग्रामिण), गृह विभाग यांचे समोर

क्रमांक: पीडीई- ०१२२/प्र.क्र.७४/पोल-६ब

| | |
|---|---|
| अपिल | अपिलार्थी श्री. राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, नेमणूक जळगांव, तत्कालीन नेमणूक असेबी घटक-धुळे. |
| | विरुध्द |
| शिस्तभंग प्राधिकारी | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |

मुंबई पोलिस (शिस्त व अपिल) नियम, १९५६ मधील नियम ११ अन्वये दाखल केलेल्या अपील अर्जावर सुनावणी

१.प्रस्तावना :- अपिलार्थी श्री. राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, नेमणूक जळगांव, तत्कालीन नेमणूक असेबी घटक-धुळे, (ज्यांचा उल्लेख यापुढे अपिलार्थी असा करण्यांत आला आहे) यांना शिस्तभंग प्राधिकारी तथा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे जा. क्र. पोमंस/११/२२/६-विचौ/१५१/२०१८ दिनांक ३१.१२.२०२१ च्या आदेशान्वये अपिलार्थी यांना त्यांच्या सेवनिवृत्ती वेतनातून दरमहा रु.५०००/- (रु. पाच हजार फक्त)०२ दोन वर्ष कपात करणे ही शिक्षा बजाविण्यांत आली आहे. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी शासनास अपील अर्ज दाखल केला आहे. सदर अपीलावर दिनांक १३.०५.२०२२ रोजी माझेसमोर सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीसाठी अपीलार्थी स्वतः उपस्थित होते. तसेच शिस्तभंग प्राधिकारी यांचे कार्यालयातील सुनावणीस उपस्थित राहण्यास प्राधिकृत केलेले प्रतिनिधी उपस्थित होते.

२. दोषारोप:-

१. तुम्ही दि.०५/०६/२०१८ रोजी हॉटेल इमरॉल्ड पार्क नाशिक येथील तळमजल्यावरील रेस्टारंट मध्ये तक्रारदार श्री. वाकेकर व त्यांचे मित्र श्री. बोडके यांच्यासोबत आर्थिक व्यवहाराबाबत तत्का पोलीस उप अधीक्षक (एटप) शत्रुघ्न देविदास माळी यांचेमार्फत मध्यस्थी म्हणून तक्रारदाराची भेट घेतली. भेटी दरम्यान "मी काय म्हणतो मी डिस्काउंट करुन देतो, त्यांनी पंधरा (१५) सांगितले तर मी तेरा (१३) करुन देतो, त्यांनी दहा (१०) सांगितले तर मी आठ (०८) करुन देतो" असे आर्थीक व्यवहाराचे तक्रारदारासोबत संभाषण करुन कर्तव्यपरायणता न ठेवता कर्तव्याप्रती सचोटी ठेवली नाही.

२. तक्रारदार वाकेकर व तत्का. पोलीस उप अधीक्षक (एटप) शत्रुघ्न देविदास माळी यांची दि.३०/०५/२०१८ रोजी भेट झाल्यानंतर श्री.माळी यांचा मो.क्र.९८९२७७१७७२ यावर पोनि परदेशी यांनी आर्थीक मोबदला मेळावा या उद्देशाने जाणीवपूर्वक दि.३०/०५/२०१८, दि.०१/०६/२०१८, व दि.०५/०६/२०१८ या कालावधीत अनिष्ट हेतुने ७ वेळा संपर्क केल्याचे प्रकर्षाने दिसत आहे. पोलीस निरीक्षक परदेशी हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे कार्यरत असतांना अधिकाराचा गैरवापर करुन आर्थीक व्यवहाराची मध्यस्थी करणे हे संशयास्पद व आक्षेपार्ह असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यपद्धती व गरीमा लक्षात घेता पूर्णतः विसंगत्त व अशोभनिय आहे. तुम्ही पो.नि. शत्रुघ्न देविदास माळी व पो.नि.. राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागात काम करतांना आपला आर्थिक फायदा करुन घेण्यासाठी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन संशयास्पद व आक्षेपार्ह वर्तन करुन कर्तव्यात गंभीर कसुरी केली आहे.

३अपिलार्थीचे म्हणणे :-

उपरोक्त विषय व संदर्भ क्र ३ अन्वये सविनय सादर को, आम्ही महाराष्ट्र पोलीस दलात ३६ वर्ष कर्तव्यनिष्ठ व प्रामाणिकपणे सेवा करून ३१ मे २०२० ला जळगाव घटकातून पो.नि पदावरून सेवानिवृत्त झालो. सेवाकाळात वरीष्ठांकडून ३०० बक्षिसे व ०६ पदोन्नती देण्यात आली त्यामुळे प्रशासनातील काही लोकसेवकांनी अन्यायाचे संगनमत करून व्देष भावनेने नुकसान करण्यासाठी सन २०१४ पासून अत्याचार व छळवणूक चालू

केली. म्हणून आम्ही वरिष्ठांकडे वेळोवेळी न्याय मागितला परंतू न्याय मिळत नसल्याने संबंधितांविरोधात मा. न्याय देवतेकडे जाण्यासाठी फौ.प्र.सं सन १९७३ कलम १९७ अन्वये पोलिस प्रशासनाकडे परवानगीची मागणी केली परंतू परवानगी देण्यात आली नाही. आपणही उपरोक्त संदर्भ क्र.१ व २ अन्वये पोलिस प्रशासनाकडून याबाबत अहवाल मागितला. म्हणून पोलीस प्रशासनाने आमचा संबंध नसतांना फसवणूक करून सेवानिवृत्तीस ४ महिने बाकी असतांना विभागीय चौकशी चालू केली तसेच चौकशीचे कारण देऊन सेवानिवृत्तीपूर्वी मिळणारे उपदान व इतर धनराशीचा लाभ दिला नाही व सन २०२१ पासून नाशिक सेवानिवृत्ती वेतन बंद करून आर्थिक छळवणूक चालू केली. चौकशी कामी बचावाच्या साक्षीदारांची तपासणी करण्याची मागणी केली असता तपासणी केली नाही. तसेच CDR ची मागणी केली तेव्हा सांगण्यात आले की कपनीशी पत्रव्यवहार केला आहे त्यासाठी २ वर्षांचा कालावधी लागेल तोपर्यंत अंतिम अहवाल पाठवता येणार नाही. म्हणून CDR नको असा अर्ज देण्यास सांगितले, मग आम्ही विचार केला की आधिच १ वर्षापासून मासिक निवृत्तीवेतन प्रशासनाकडून देण्यात आलेली नाही व अजून २ वर्ष थांबणे फार अवघड आहे. अशी अडवणूक झाल्याने CDR नको म्हणून अर्ज दिला.

अशा प्रकारे बचावाची संधी न देता संदर्भ क्र ३ अन्वये अंतिम आदेश देऊन रू ५००० दरमहा २ वर्ष निवृत्ती वेतनातून द्रव्य धनराशी कपात करणेची शिक्षा निर्गमित केली ती आम्हास मान्य नाही. संबधित शिक्षा रद्द होणेस विनंती. १. मा. श्री. संजय पांडे सो पोलीस महासंचालक म.रा. मुंबई महोदयांनी आदेश क्र पो.म.स. /११/२२/६ विचौ/१५१/२०१८ दि. ०७/१०/२०२१ ची कारणे दाखवा नोटीस दिली त्या अन्वये अभिवेदन देण्यात आले त्यासंदर्भात सविनय सादर की आम्ही ला.प्र. विभाग नाशिक येथे कार्यरत असतांना मा. श्री. पंजाबराव उगले सो तत्कालीन पोलिस अधिक्षक नाशिक महोदयांनी अन्यायाचे संगनमताने नुकसान करण्याच्या हेतून प्राथमिक चौकशीत आम्हास बचावाची संधी न देता दोषारोप लावून खोटा अहवाल पाठवला. २. त्यामुळे मा. श्री. संजीव कुमार सिंघल सो अप्पर पोलिस महासंचालक प्रशासन म.रा. मुंबई महोदयांनी आपलेकडील आदेश क्र.कक्ष/पोम/११/२२/६-विचा/१५१/२०१८ दि.२८/१/२०२० अन्वये चालू केलेल्या विभागीय चौकशी नोटिस मध्ये आमचे संभाषण हे बरोबर आहे कारण मा. श्री. पंजाबराव उगले महोदयांचे आदेशान्वये आम्ही चर्चेत सहभाग घेऊन संभाषण केले. परंतु त्यातील दोषारोप मान्य नाही. दोषारोप १) तुम्ही दि. ०५/०६/२०१८ रोजी हॉटेल इमरॉल्ड पार्क, नाशिक येथील तळमजल्यावरील रेस्टॉरंट मध्ये तक्रारदार श्री. अरविंद लक्ष्मण वाकेकर व त्यांचे मित्र श्री. बोडके यांच्या सोबत आर्थिक व्यवहारा बाबत श्री. शत्रुघ्न माळी पोलिस उपअधिक्षक ला.प्र.वि धुळे यांचे मार्फतीने मध्यस्थी म्हणून तक्रारदाराची भेट घेतली. भेटी दरम्यान "मी काय म्हणतो मी डिस्काऊंट करुन देतो. त्यांनी पंधरा (१५) सांगितले तर मी तेरा (१३) देतो. त्यांनी दहा (१०) सांगितले तर मी आठ (८) करुन देतो." असे आर्थिक व्यवहाराचे तक्रारदारा सोबत संभाषण करुन कर्तव्यपरायण न ठेवता कर्तव्यापोटी सचोटी न ठेवता विपर्यास्त वर्तन केले आहे.

दोषारोप २) आपण तक्रारदार श्री. वाकेकर व श्री. शत्रुघ्न माळी पोलिस उप अधिक्षक ला.प्र.वि धुळे यांची दि. ३०/०५/२०१८ रोजी भेट झाल्यावर श्री. माळी यांच्या मोबाईल क्र. ९८९२७७१७७२ यावर आपण आर्थिक मोबदला मिळावा या उद्देशाने जाणीवपूर्वक दि. ३०/०५/२०१८दि. ३१/५/२०१८ व ०५/०६/२०१८ या कालावधीत विशिष्ट हेतुने ७ वेळा संपर्क केल्याचे प्रकर्षाने दिसत आहे. आपण ला.प्र.वि. नाशिक येथे कार्यरत असतांना अधिकाराचा गैरवापर करुन आर्थिक व्यवहाराची मध्यस्थी करणे हे संशयास्पद व आक्षेपार्ह असून ला.प्र. विभागाची कार्यपध्दती व गरीमा लक्षात घेता पुर्णतः विसंगत व अशोभनिय आहे. तुम्ही ला.प्र. विभागात काम करतांना आपला आर्थिक फायदा करून घेण्यासाठी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन संशयास्पद व आक्षेपार्ह वर्तन करुन कर्तव्यात गंभीर कसूरी केली आहे. असा दोषारोप ठेवण्यात आलेला आहे. तो आम्हास

...न्य नाही. मा. श्री. पंजाबराव उगले महोदयां बाबत स्पष्टीकरण- साक्षीदार श्रीमती संघमित्रा बाविस्कर नायब तहसिदार निफाड भ्रमणध्वनी क्र. ९६२३२८९७९३ / . ९८८१६९९७८६ व श्री गोरख बोडके जमिन वादावादी व्यवहाराचे दलाल (प्रॉपर्टी एजंट) इगतपुरी भ्रमणध्वनी क्र. ९९२२७५०५९९ हे मा.पंजाबराव उगले महोदयांना भेटल्यावर परदेशी साहेब हे आमचे ओळखीचे आहेत असे सांगितल्याने मा. श्री. उगले महोदयांनी आम्हास बोलावून तोंडी आदेशाद्वारे सांगितले की, हे माझे परिचित आहेत. श्री. शत्रुघ्न माळी तत्का. पोलिस उपअधीक्षक, ला.प्र.वि.धुळे यांचेशी फोनद्वारे संपर्क करुन व्यवहारात मदत करा, कोणते काम आहे ते सांगितले नाही. आम्ही ही वरिष्ठांचा आदेश असल्याने अविश्वास दाखविला नाही. व्यवहारात मदत करण्याच्या दृष्टीने त्यासंबंधी संभाषण केले.

४. नंतर श्रीमती संघमित्रा बाविस्कर नायब तहसिदार निफाड यांनी आम्हास सांगितले की, श्री. शत्रुघ्न माळी तत्का, पोलिस उप अधीक्षक, ला.प्र.वि.धुळे व श्री. सुदाम महाजन तहसिलदार शिंदखेडा धुळे यांचे विरुध्द माझे पती श्री. अरविंद वाकेकर यांनी लाच मागणीची तक्रार दिली. परंतु श्री. पंजाबराव उगले साहेब हे लाचेच्या तक्रारीत तुमचेही नाव समाविष्ठ करण्यास सांगत आहेत. आम्ही त्यांना सांगितले की, पोलिस निरीक्षक परदेशी साहेब हे इगतपुरीला आमच्या बरोबर होते. त्यांनी आमच्या कडे कधीही पैशांची मागणी केली नाही. आम्ही त्यांना जमिनीच्या व्यवहाराचे काम आहे. असे सांगितले आहे. आमची तक्रार श्री. शत्रुघ्न माळी तत्का. पोलिस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे व श्री. सुदाम महाजन तहसिलदार शिंदखेडा धुळे यांचेविरुध्द आहे. परदेशी यांचेविरुध्द नाही परंतु ते दबाव टाकत आहे. तरी तुम्ही सावध रहा. अशा प्रकारे षडयंत्राबाबत आम्हास समजल्यावर आम्ही मा. उगले महोदयांना कायदेशीर आदेश देणेसंबंधी दि. ७/६/२०१८ रोजी निवेदन दिले. मा.श्री. कडासने महोदयांनी चौकशीतील दस्ताऐवज / नस्ती नकलांच्या छायांकित प्रती दिल्या. त्याप्रमाणे मा.श्री. पंजाबराव उगले महोदयांनी ही निवेदनावर स्वाक्षरी करून त्याची छायांकित प्रत आम्हास दिली. (कायदेशीर आदेश विनंती पान नं. "अ" वर) जर तक्रारी नुसार लाचेचा सापळा कारवाई करण्यात आली असती तर सापळा यशस्वी होऊन तक्रारदारास न्याय मिळाला असता व ला.प्र. विभागाची लाच खोरांमध्ये दहशत जरब निर्माण झाली असती. ज्यांचे विरुध्द लाचेची तक्रार आहे त्यांना दोषमुक्त करण्यासाठी पो.ना. ब. नं. ३७१ दिपक अर्जुन राऊत नेमु. ला.प्र.वि. नाशिक यांनी दिलेले CDR हे गायब करून आमचा काही संबंध नसतांना आरोपी / अपचारी करण्यात आले. ही ला.प्र. विभागाची कार्यपद्धती आहे का ? ५. मा. श्री. पंजाबराव उगले महोदय हे तक्रारदाराला न्याय न देता लाचखोरांना संरक्षण देतात कारण यावल पोलिस ठाणे जळगांव भाग-६ ..गु.र.नं. ३०४९/२०१७ ला.प्र. अधिनियम सन १९८८ कलम ७ व भा.द.वि. कलम २०१ इ. दि. ०६/११/ २०१७ मधील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार लाचेचा सापळा यशस्वी झाला. म्हणून मा. श्री.जी.एम.ठाकूर पोलिस उपअधिक्षक, ला.प्र. विभाग, जळगाव यांनी त्यांच्याकडील जा.क्र.४३८/२०१७ दि.२३/०२/२०१७ अन्वये विनंती करून गुन्हा दाखल करण्याची परवानगी मागितली, परंतू त्यांना परवानगी न देता लाचखोरांना संरक्षण दिले. ६. त्यामुळे तक्रारदार मा. उच्च न्यायालय, म.रा. मुंबई खंडपीठ औरंगाबाद महोदयांकडे साधीलेख याचिका / WRIT PETITION दाखल करून न्याय मिळण्याची विनंती केल्यावर प्रकरणाची चौकशी करुन न्यायदेवतेने ला.प्र. विभाग तसेच मा. श्री. पंजाबराव उगले महोदयांची कार्यपध्दतीचे वस्त्रहरण केल्यानंतर ९ महिने उशिराने लाचखोरां विरुद्ध गुन्हा दाखल केला. हि ला.प्र. विभागाची कार्यपद्धती आहे का ? आम्ही जळगाव येथे पोलिस निरीक्षक म्हणून कार्यरत असतांना मा. श्री. पंजाबराव उगले महोदय हे घटक प्रमुख म्हणुन बदलून आले. त्यांनी जळगाव येथेही आम्हास तोंडी आदेश देऊन शिडी अहमदनगर येथे बंदोबस्तास जाण्यास सांगितले. त्यानुसार मा. दिलीप पाटील पोलिस उपअधिक्षक मुख्यालय जळगाव यांचेकडील जावक क्र. ४०/२०२० दि. १५/०१/२०२० पत्र घेऊन शिर्डी जि. अहमदनगर येथे गेलो असता स.पो. नी श्रीगंधाले शिर्डी

पोलिस ठाणे यांनी त्यांचे वरिष्ठांशी भ्रमणध्वनी / दूरध्वनी द्वारे संपर्क / चर्चा करुन कायदेशीर आदेश नसल्याने कर्तव्य दिले नाही.

म्हणून कायदेशीर आदेश म्हणजे कोणता आदेश हवा असे विचारले. तेव्हा त्यांनी सांगितले की, अंतर्जिल्हा बंदोबस्तासाठी मा. पोलिस महासंचालक सो. म.रा. मुंबई किंवा मा. विशेष पोलिस महानिरीक्षक सो. नाशिक परिक्षेत्र महोदयांची परवानगी तथा आदेश आवश्यक आहे. म्हणून या बेकायदेशीर आदेशा अन्वये मा. पोलिस अधीक्षक सो. अहमदनगर महोदयांनी कर्तव्य देण्यास नकार दिला. त्यामुळे कर्तव्य न करता ५ महिने शिर्डी परिसरात थांबून राहिलो.

मा.श्री. उगले महोदयांनी श्री. दिलीप पाटील पोलिस उप अधिक्षक मुख्यालय जळगाव यांच्यावर दबाव टाकून खोटा अहवाल देण्यास सांगितले परंतू त्यांनी त्यास नकार दिला त्यामुळे मा. श्री. उगले महोदयांना वरीष्ठांकडे कसुरी अहवाल पाठविता आला नाही. (तोंडी बंदोबस्त आदेश पान नं. "ब" वर आहे ) २०१९ चे निवडणूक प्रचार सभेसाठी मा. पंतप्रधान भारत सरकार महोदय महाराष्ट्र दोन्यावर आले असतांना बंदोबस्तात हलकेला म्हणून मा. श्री. दत्ता शिंदे तत्का पोलिस अधीक्षक जळगांव महोदयांना नारळ देण्यात आला. त्याच दरम्यान मा. श्री. गजानन राठोड, उपविभागीय पोलिस अधिकारी. भुसावळ विभाग यांच्या अधिनस्त मा.श्री.पंजाबराव उगले महोदयांच्या आदेशान्वये कर्तव्यावर हजर असतांना मा. श्री. गले महोदयांनी त्यांच्याकडील क्र.५६/वीचो/३/पोनि-मुक्ताईनगर/४२२/२०१९दि. ४/१०/१९ अन्वये पद व अधिकाराचा दुरुपयोग करून खोटी नोटीस दिली. त्यात नमूद केले की मा. पंतप्रधान भारत सरकार यांचा औरंगाबाद जिल्हा दौरा कार्यक्रम असल्याने जळगाव जिल्हा पोलिस दलाच्या आस्थापने वरील पोलिस अधिकारी / कर्मचारी यांना सुरक्षा बंदोबस्ता करता औरंगाबाद ग्रामीण घटकास दि. ७/९/२०११ रोजी पाठविणे बाबतचे आदेश कार्यालया कडून निर्गमित करण्यात आले आहे नमूद बंदोबस्ताकामी आपली नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर बंदोदस्तास आपण जाणीवपूर्वक गैरहजर राहिलेला आहात. ......१०. मा. श्री. सुनिल कडासने सो. पोलिस अधीक्षक ला.प्र.वि. नाशिक महोदयांना निवेदनाद्वारे अवगत केले की, श्री. पंजाबराव उगले महोदयांनी कट कारस्थानाद्वारे नुकसान करण्यासाठी आम्हास तोंडी आदेशाद्वारे जमिनीचा व्यवहारात मदत करणेस सांगुन हॉटेल एमरॉन पार्क नाशिक येथे बोलावून व्यवहारासंबंधी चालू असलेल्या संभाषणाचे ध्वनीमुद्रन करुन खोटा अहवाल पाठवून विभागीय चौकशीचे काम चालू केले. मा. श्री. पंजाबराव उगले व त्यांनी कोणाकोणावर आपल्या अधिकार व पदाचा दबाव टाकून खोटे अहवाल मागविण्याचा प्रयत्न केला त्यांना बचावाचे साक्षीदार म्हणून बोलावून चौकशी कामी निवेदन / तपासणी / फेरतपासणी / उलट तपासणी इ. घेण्याची दि. २२/१०/२०२० ला विनंती केली. ११. आपण जर निवेदनाचे अवलोकन केले तर आपणास असे निदर्शनास येईल की, बचावाचे साक्षीदार १. मा. श्री. पंजाबराव उगले तत्कालीन पोलिस अधिक्षक ला.प्र.वि नाशिक २. मा. श्री. जी एस ठाकूर पोलिस उप अधिक्षक ला.प्र.वि जळगाव ३. मा. श्री. दिलीप पाटील पोलिस उप अधिक्षक मुख्यालय, जळगाव ४. मा. श्री. गजानन राठोड उप विभागीय पोलिस अधिकारी, भुसावळ जळगाव यांचे चौकशी कामी निवेदन / तपासणी / फेरतपासणी / उलट तपासणी इ. सत्य घटना बाहेर येण्यासाठी आवश्यक आहे. परंतु, मा. श्री. सुनिल कडासने महोदयांनी सांगितले की, तक्रारीचा व बचावाच्या साक्षीदाराचा काही एक संबंध नाही असे म्हणून आमचे विनंती नुसार साक्षीदारांची चौकशी केली नाही. (बचावाचे साक्षीदारांचे विनंती पत्र पान नं. इ.वर आहे.) तसेच, महोदयांनी पत्र क्र. नाप/ अंकव्यू/निवेदन श्री. परदेशी/ २०२१ ११९४ दि. १२/३/२०२१ अन्वये आपणासही अवगत केले की, पोलिस निरीक्षक परदेशी यांनी केलेल्या तक्रारी या कार्यालयाशी संबंधीत नाही. त्यांचे निवेदन अवलोकनार्थ सादर आहे. परंतु, आपणा कडूनही त्या बाबत योग्य कार्यवाहीचा आदेश झाला नाही. बचावासाठी आम्ही C.D.R. ( कॉल डिटेल रेकॉर्ड ) ची मागणी केली परंतु,

वर्ष झाले तरी १३. आम्हास C.D.R. दिला नाही. आता जर त्याची मागणी केली तर ५ ला अंतिम अहवाल ... असते साहेब पाठविणार नाही असे कार्यालयातून समजले. म्हणून आम्ही परत C.D.R. नको म्हणून विनंती केली. अंतिम अहवाल पाठविला नाही म्हणून दि. ०८/०९/२०२१ रोजी आपली भेट घेऊन अडचणी बाबत विनंती केली. त्यामुळे आपण दुरध्वनीद्वारे संबंधीतांशी संपर्क करून अहवाल पाठविणेस सांगितले. अहवाल लवकर पाठवावा म्हणून आम्ही मा.श्री. सुनिल कडासने महोदयाची दि. १३/०९/२०२१ रोजी नाशिक येथ कार्यालयात भेट घेऊन विनंती केली. परंतु, आम्ही आपणास भेटल्यामुळे महोदय अत्यंत क्रोधीत झाले. १४ आपण न्यायप्रिय तसेच आमचे सर्वस्व असुन आम्ही जर दोषी असतो तर आपल्या समोर न्याय मिळणसाठी वा... चक्र वेळा आलोच नसतो. महोदय ३५ वर्षाच्या पोलिस दलाच्या सेवेत वरिष्ठांकडून ३०० बक्षिस देण्यात आले तसेच ६ पदोन्नती मिळालेली आहे. मा. श्री. पंजाबराव उगले सो. तत्का. पोलिस अधीक्षक ला.प्र.वि. विभाग. नाशिक यांनी फसवणुक करून खोटा अहवाल पाठविला त्या चौकशीत C.D.R. व साक्षीदार तपासुन चौकशी अधिकारी यानी बचावाची संधी दिली नाही. अत्याचार व अन्याय करणाऱ्या विरुद्ध आम्ही फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७ अन्वये आपणाकडे न्यायालयात जाण्यासाठी गुन्हा दाखल करून परवानगीची मागणी केली आहे. त्यामुळे आपल्या कडील क्र. पोमसं/१४/६६/१९७ जळगांव/५३७/२०१८ दि. २१/१२/२०१८ अन्वये संबंधीतांकडुन चौकशीचा अहवाल मागितला आहे. परंतु, अद्यापपर्यंत परवानगी दिलेली नाही. तरी तात्काळ देण्यास विनंती. १७. मा. श्री. सुनिल कडासने सो. चौकशी अधिकारी महोदयांनी पत्र क्र. लाप्रवि/नाशिक कसुरी/माळी व परदेशी/ २०२०/४१८४ दि. १५/९/२०२१ अन्वये अहवाल पाठविला. त्या अन्वये मा. पोलिस अधीक्षक जळगांव महोदयां कडून दि.१५/११/२०२१ रोजी आपणा कडील खुलासा देणे संबधी संदर्भीय आदेश प्राप्त झाला.

१८. संदर्भीय आदेशान्वये दर महा रु. ५०००/- दोन वर्ष द्रव्य दंड वसुलीची शिक्षा प्रस्तावित करण्यात आली. ती आम्हास मान्य नाही. कारण १) आमचा काही एक संबंध नसल्याने आमच्या विरुध्द No Complaint २) No Demand ३) No Accept असे असतांना आम्हास बचावाची संधी न देता फसवणुक करण्यात आली. आपण न्यायप्रिय असुन समक्ष चौकशी करुन न्याय द्याल ही अपेक्षा तसेच, सेवानिवृत्ती मासिक वेतन व उपदान देण्यासाठी संबंधीतांना आदेश होणेस विनंती...

मी संजय पांडे, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई याव्दारे सेवानिवृत्त पोलिस निरीक्षक: राजेंद्रसिंह शंकरसिंह परदेशी यांना कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेली त्यांच्या निवृत्ती वेतनातून दरमहा रु ५०००/- (पाच हजार रुपये) २ वर्ष कपात करणे ही शिक्षा अंतिम आदेशात देत आहे. उक्त कसुरदार हे सदर निणयाने व्यथित होत असतील तर ते आदेश मिळालेल्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत योग्य मार्फतीने शासनास गृहविभागाकडे अपिल सादर करू शकतात. मा.श्री.संजय पांडे सो पोलीस महासंचालक म.रा. मुंबई महोदयांनी सक्षम अधिकारी म्हणून कागदपत्रांचे अवलोकन करून नमूद केले की, "विभागीच चौकशी मध्ये सेवानिवृत्त राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी हे तक्रारदार यांना प्रत्यक्ष भेटले तसेच त्याच्याशी फोनवरून बोलण्याचे संभाषण हे रेकॉर्ड झालेले आहे यावरून सेवानिवृत्त परदेशी यांच्या वरील दोषारोप सिद्ध झालेले आहे" असा अभिप्राय नोंदविला आहे. सदर प्रकरणात आमचा काही संबंध नसल्याने आमच्या विरुद्ध No Complaint २) No Demand ३) No Accept असे असतांना फसवणूक करण्यात आली (अ) कोणाच्या आदेशान्वये भेट घेतली किंवा कोणी पाठवले (ब) संभाषण कोणत्या व्यवहारासंबंधी केले हे सत्य समोर तथा बाहेर येण्यासाठी मा. श्री. सुनिल कडासने पोलीस अधिक्षक तथा चौकशी अधिकारी ला.प्र.वि. नाशिक महोदयांकडे सी.डी.आर (कॉल डिटेल रेकॉर्ड) तसेच बचावाचे साक्षीदार मा.श्री. पंजाबराव उगले व संबंधितांची तपासणी करण्याची मागणी केली परंतू महोदयांनी बचावाच्या साक्षीदारांची तपासणी केली नाही व CDR हा

दिले नाही व त्यांच्या विरुद्ध आलेली तक्रार होती त्यांना दोषमुक्त करण्यासाठी ... आहे
दोषी ठरवून शिक्षात्मक अहवाल दिला अशा प्रकारे विभागीय चौकशीत आरोप नव्याने दोषी ठरवले आहे
याबाबत दि. २८/११/२०२१ रोजी दिलेल्या अभिवेदनात पान क्र. ५ ते ७ अनुक्रमांक ... मध्ये
नमूद केले आहे. संदर्भ क्र. ३ अन्वये ५०००/- रुपये दरमहा २ वर्षे मासिक वेतनातून कपात करण्याची शिक्षा आदेश
रद्द होणेस विनंती.

४. शिस्तभंग प्राधिकारी यांचे म्हणणे :- सदरचे अपील फेटाळण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी सादर केलेले अपील हा अभिलेखाचा भाग आहे. सदर प्रकरणी अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेण्यात आली आणि उपलब्ध कागदपत्रे तपासण्यात आली. तसेच शिस्तभंग प्राधिकारी यांचे कार्यालयातील प्रतिनिधी सुनावणीस हजर राहण्यासाठी प्राधिकृत केलेल्या संबंधित अधिकारी यांचे म्हणणे ऐकले.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांचेविरुद्ध कोणतीही तक्रार नाही. अपिलार्थी यांनी कोणाकडे पारिश्रमिक पैशाची मागणी केली या बाबी सिद्ध झाल्या नाहीत. तसेच मागणी केलेली रक्कम स्विकारताना व्यतिरीक्त अपिलार्थी यांचेविरुद्ध सापळा कारवाई करण्यात आलेली दिसून येत नाही. केवळ तक्रारदारासमवेत अपिलार्थी यांनी केलेल्या संभाषणाबाबत संशयाआधारित अपिलार्थी यांना शिक्षा बजावण्यात आल्याचे दिसते. अपिलार्थी यांचेवरील दोषारोप निर्विवादपणे सिद्ध होण्याइतपत पुरेसा आधार/पुरावा दिसून येत नाही.

एकंदरीत प्रकरणाचे स्वरुप, उपलब्ध कागदपत्रे आणि अपिलार्थी यांनी त्यांच्या अपिल अर्जाद्वारे तसेच, प्रत्यक्ष सुनावणी दरम्यान केलेल्या अभिवेदनाद्वारे मांडलेल्या बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत कलम २७-ए नुसार प्रदान केलेल्या अधिकारानुसार आणि महाराष्ट्र पोलिस (शिक्षा व अपीले) नियम,१९५६ मधील नियम ११ खाली प्राप्त झालेल्या अपील अर्जावर नियम १८ नुसार पुढीलप्रमाणे निर्णय देत आहे.

निर्णय

१. अपिलार्थी श्री. राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, नेमणूक जळगांव, तत्कालीन नेमणूक असीबी घटक धुळे यांचा अपिल अर्ज मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थी श्री. राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, नेमणूक जळगांव, तत्कालीन नेमणूक असीबी घटक धुळे यांना शिस्तभंग प्राधिकारी तथा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे जा. क्र. पोमसं/११/२२/६-विचौ/१५१/२०१८ दिनांक ३१.१२.२०२१ च्या आदेशान्वये अपिलार्थी यांना दिलेली त्यांच्या **सेवानिवृत्ती वेतनातून** दरमहा रु.५०००/- (रु. पाच हजार फक्त) ०२ (दोन) वर्ष कपात करणे ही शिक्षा रद्द करण्यात येत आहे.

३. वरीलप्रमाणे संबंधितानी कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल शासनास त्वरीत सादर करावा.

**प्रमाणित प्रत**

(शंभूराज देसाई)
राज्यमंत्री (गृह) ग्रामीण

मुंबई
दिनांक २८/०६/२०२२

कक्ष अधिकारी
गृह विभाग, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

GOVERNMENT OF MAHARASHTRA

Government of Maharashtra
महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
पत्ता :- बस स्टँड समोर,जळगांव -425001, OFFICE PHONE - Fax -0257-2220511
Email ID:-spjalgaon@mahapolice.gov.in

पत्र

प्रति,

पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

जा.क्रमांक ५३१/लेखा-२/पेन्शन/परदेशी-व्याज/ २०५८ /२०२२ जळगांव दिनांक ३० /०९/२०२२.

संदर्भ - सेवानिवृत्ती पोलीस निरीक्षक, श्री.राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, यांचा दिनांक ०६/०९/२०२२ , २१/०९/२०२२ रोजीचा विनंती अर्ज

विषय - सेवानिवृत्त उपदान, भविष्य निर्वाह निधी, गट विमा इत्यादी धनराशीवर चक्रवाढ व्याज मिळणेबाबत."

-------oooo------

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये सविनय सादर करण्यांत येते की, जळगांव जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील सेवानिवृत्ती पोलीस निरीक्षक, राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, हे दिनांक ३१/०५/२०२० रोजी नियत वयोमाननुसार सेवानिवृत्त झाले आहे. त्यांनी या कार्यालयास सेवानिवृत्त, उपदान, भविष्य निर्वाह निधी, गट विमा इत्यादी रक्कमेवर चक्रवाढ व्याज मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

सेवानिवृत्त, पो.नि./ राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे कार्यरत असतांना त्यांनी दिनांक ०५/०६/२०१८ रोजी हॉटेल एमरॉल्ड पार्क, नाशिक येथील तळमजल्यावरील रेस्टॉरंट मध्ये तक्रारदार श्री. वाकेकर व त्यांचे मित्र श्री. बोडके यांच्यासोबत आर्थिक व्यवहाराबाबत तत्कालीन पोलीस उप अधीक्षक (ला.प्र.वि.), शत्रुघन देविदास माळी, यांचेमार्फत मध्यस्थी म्हणुन तक्रारदाराची भेट घेतला त्या दरम्यान आर्थिक व्यवहाराचे संभाषण केल्याप्रकरणी कसुरी संदर्भात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडील आदेश क्र. पोमसं/११/२२/६-विचौ/१५१/२०१९, दिनांक २८/०१/२०२० अन्वये विभागीय चौकशी करण्यांत आलेली आहे.

पो.नि./ राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, यांचे नियत नियोमान सेवानिवृत्त दिनांक ३१/०५/२०२० रोजी त्यांचे विरुध्द पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयात वर नमुद प्रमाणे विभागीय चौकशी सुरु असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम-१९८२ मधील १३० (१)(सी) मधील तरतुदीनुसार तसेच त्यासंबंधातील पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडील, अंतिम आदेश अभावी सेवानिवृत्त उपदान अनुज्ञेय नसल्याने त्यांचे नियत वयोमानसेवानिवृत्त विषयक लाभाचे प्रस्ताव मा. महालेखाकार-०१,मुंबई यांचे कार्यालयात सादर करण्यांत आले नव्हते.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडुन विभागीय चौकशी मध्ये अंतिम आदेश क्र. पोमसं/११/२२/६-विचौ/१५१/२०१८ दिनांक ३१/१२/२०२१ निर्गमीत करण्यांत आले असुन, सदर अंतिम आदेशामध्ये से.नि.पो.नि. राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, यांना " **निवृत्तीवेतनातुन दरमहा रु.५,०००/-(रु. पाच हजार फक्त) ०२ (दोन) वर्ष कपात करणे" ही शिक्षा** देण्यात आली आहे. विभागीय चौकशीमध्ये अंतिम आदेश या कार्यालयात प्राप्त झाल्याने सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक, राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, यांचे सेवानिवृत्ती विषयक सेवानिवृत्ती वेतन व सेवानिवृत्ती उपदान मंजुरी कामी या कार्यालयाचे क्र. ५३१/लेखा/२/पेंशन/२०२२/३६२, दिनांक ०९/०२/२०२२ अन्वये, मा. महालेखाकार-०१, मुंबई यांचे कार्यालयात मुळ सेवापटासह प्रस्ताव सादर करण्यांत येवुन मा. महालेखाकार-०१, मुंबई यांचेकडील क्र. PR९/NASHIK/२१२२२३२५७५/१/P/२२/१०/६१०३३९०२ A दिनांक २१/०३/२०२२ अन्वये सेवानिवृत्ती वेतन व उपदान मंजुर करण्यांत आलेले आहे.

सेवानिवृत्त, पो.नि./ राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, यांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील अंतिम आदेश दिनांक ३१/१२/२०२१ मध्ये दिलेल्या शिक्षेच्या आदेशाविरुध्द शासनास अपिल सादर केले असता, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्र पीडीई ०१२२/प्र.क्र.७४/पोल-६ ब, दिनांक २८/०६/२०२२ अन्वये " **निवृत्तीवेतनातुन दरमहा रु.५,०००/-(रु. पाच हजार फक्त) ०२ (दोन) वर्ष कपात करणे" ही शिक्षा रद्द करण्यांत आली आहे.**

त्याअनुषंगाने, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील अंतिम आदेशामध्ये " निवृत्तीवेतनातुन दरमहा
रु.५,०००/-(रु. पाच हजार फक्त) ०२ (दोन) वर्ष कपात करणे" ही देण्यांत आलेली शिक्षा महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय,
मुंबई यांचेकडील क्र. पोलीई ०१२२/प्र.क्र.७४/पोल.६ ब. दिनांक २८/०६/२०२२ अन्वये रद्द करण्यांत आल्याने श्री. पंजाबराव उगले,
तत्कालीन पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक, जळगांव यांनी पाठविलेल्या खोट्या अहवालांच्या अनुषंगाने
चालु असलेल्या विभागीय चौकशी मुळे ०२ वर्ष विलंबाने देण्यांत आलेल्या भविष्य निर्वाह निधी, उपदान, गट विमा, मासिक वेतन देय
रक्कमावर चक्रवाढ व्याज मिळणेस या कार्यालयात विनंती केली आहे.

सेवानिवृत्त, पो.नि./ राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी यांच्या कसुरीच्या अनुषंगाने सुरू असलेल्या विभागीय चौकशी / अंतिम
आदेशामुळे त्यांना भविष्य निर्वाह निधी, उपदान, गट विमा व इतर देय रक्कम प्रदान करण्यास विलंब झालेला असल्याने त्यांची सदर
रक्कमावर चक्रवाढ व्याज मिळणे बाबतची विनंती अमान्य करण्यांत यावी बाबत शिफारस करण्यांत येत आहे. सोबत सेवानिवृत्त,
पो.नि./ राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, यांचा संदर्भीय विनंती अर्ज व सहपत्र पुढील कार्यवाहीसाठी या सोबत सादर केले आहेत. सविनय
सादर.

(डॉ. प्रविण मुंढे)
पोलीस अधीक्षक, जळगांव.

मार्फतीने सादर:-

विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र नाशिक.

प्रत:- सेवानिवृत्त, पो.नि./ राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, रा. बी टाईप २/६ स्नेहबंधन पार्क,
पोलीस अधिकारी वसाहत, गंगापूर रोड, नाशिक मो.नंबर-८८८८८७२९२९

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३९/४२/चक्रवाढ व्याज मिळणेबाबत/सेनि पो.नि.परदेशी/१८३/२०२२ दिनांक११ /०३/२०२४

**संदर्भ :-** कार्यालयीन समक्रमांकित दि.०६/०२/२०२४ व दि.२६/०२/२०२४ चे ज्ञापन

**विषय :** -सेवानिवृत्तीसमावेत,मिळणारीउपदान,भ.नि.नि.,गटविमातसेच,थकित मासिक वेतन, प्रवासभत्ता, रजा व पेन्शन विक्री इ. इत्यादी धनराशीवर विलंबाच्या कालावधीत चक्रवाढ व्याज मिळणेबाबत.

****

श्री राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक, पोलीस जळगांव यांनी त्यांना सेवानिवृत्तीनंतर मिळणारे लाभ विलंबाने प्राप्त झाले असल्याने त्यावर चक्रवाढ व्याज मिळणेस विनंती केली आहे. पोलीस अधीक्षक जळगांव यांनी दि.२०/०६/२०२३ अन्वये या कार्यालयाच्या मार्फतीने शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावात पोलीस अधीक्षक, जळगांव यांनी श्री परदेशी यांची सेवानिवृत्त उपदान, भविष्य निर्वाह निधी गट विमा योजना इ. सेवानिवृत्ती लाभांवर चक्रवाढ व्याज मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्याबाबत केलेली शिफारस शासनाने दि.२७/१२/२०२३ च्या पत्रान्वये मान्य केली आहे.

२. त्यानंतर श्री परदेशी यांनी पुन्हा दि .०२/०२/२०२४ च्या पत्रान्वये सेवानिवृत्ती समावेत मिळणारी उपदान, भविष्य निर्वाह निधी, गट विमा तसेच थकीत मासिक वेतन, प्रवास भत्ता, रजा व पेन्शन विक्री इ. धनराशीवर विलंबाच्या कालावधीत चक्रवाढ व्याज मिळणेबाबत विनंती केली आहें. सदर अर्जाच्या अनुषंगाने मुद्येनिहाय परिपूर्ण तपशीलासह फेरप्रस्ताव सादर करणेबाबत पोलीस अधीक्षक, जळगांव यांना या कार्यालयाचे संदर्भाधिन ज्ञापान्वये कळविण्यात आले आहे . तथापि सदरचा प्रस्ताव अद्याप या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. तरी खालील मुद्यांच्या अनुषंगाने सविस्तर असा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

१. श्री परदेशी यांनी दि.०४/०३/२०२० रोजी भविष्य निधीचे अंतिम प्रदानाचा प्रस्ताव कार्यालयास सादर केल्यानंतर सदरचा प्रस्ताव महालेखाकार, मुंबई कार्यालयास कधी सादर करण्यात आला.

२. श्री परदेशी यांनी अर्जात नमूद केले की, त्यांचे १० महिने वेतन बंद करण्यात येवून ती धनराशी माहे जानेवारी 2022 मध्ये रु.4,09,625/- एकरक्कमी देण्यात आली. त्यावरील व्याज मिळणेबाबत विचारणा केली आहे. त्या अनुश्रंगाने त्यांना कोणत्या 10 महिन्याचे वेतन देण्यात आले नाही व का देण्यात आले नाही याबाबतचे स्पष्टीकरण देण्यात यावे.

३. श्री परदेशी यांना रजा रोखीकरणाची रक्कम केव्हा देण्यात आली. उशीराने देण्यात आली असल्यास त्याबाबतची कारणे काय आहेत.

४. श्री परदेशी यांनी त्यांना हिवाळी अधिवेशन नागपूर बंदोबस्त आणि ५ महिन्याचा शिर्डी बंदोबस्त यांचे प्रवासभत्ता बील दिले नसल्याचे नमूद केले आहे. तरी ते कधी देण्यात आले व वेळीच का देण्यात आले नाही याबाबतचे स्पष्टीकरण.

५. सदर प्रकरणी प्रचलीत नियम तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपुर ३०९४/प्र.क्र.९३/सेवा-

१०, दि.२२/११/१९९४ नुसार कार्यवाही करुन सविस्तर प्रस्ताव तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

६. वित्त विभाग अधिसुचना दि.१/११/२००८ अन्वये, म.ना.से.(नि.वे.) नियम, १९८२ मधीन नियम १२९(ए) मध्ये केलेल्या सुधारणेनुसार विलंबाने प्रदान उपदानावर व वित्त विभाग शासन निर्णय, दि.२०/०६/१९९६ नुसार विलंबाने प्रदान रजा रोखीकरण रकमेवर व्याज देय होत असेल अशा प्रकरणी सदर विलंबाची जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. विलंबास जबाबदार अधिकाऱ्यांसहित, शासकीय कर्मचाऱ्यांकडून देय झालेल्या व्याजाची रक्कम वसूल करण्याची तरतूद आहे. याअनुषंगाने काही कार्यवाही करण्यात आली आहे किंवा कसे ? याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा.

७. तसेच श्री परदेशी यांनी केलेल्या अपीलानुसार शासन पत्र क्र.पीडीई ०१२२/प्र.क्र.७४/पोल-६ब, दि.२८/०६/२०२२ अन्वये त्यांना देण्यात आलेली त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून दरमहा रु.५०००/- दोन वर्ष कपात करणे ही शिक्षा रद्द करण्यात आली आहे. तरी सदर शासन पत्राच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सदर प्रस्तावासोबत सादर करण्यात यावा.

Signed by KALPANA KISAN LOKHANDE
Date: 11-03-2024 12:32:04
Reason: Approved

(कल्पना लोखंडे)
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उप सहायक(नि.वे)(अति.कार्य)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

पोलीस अधीक्षक, जळगांव

प्रत,

विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

E- 800 127
दि. 11/03/2024

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३९/४२/ चक्रवाढ व्याज मिळणेबाबत/सेनि पो.नि.परदेशी/१८३/२०२२ दिनांक २६/०२/२०२४

**विषय :-सेवा निवृत्ती समावेत, मिळणारी उपदान, भ. नि. नि., गट विमा तसेच, थकित मासिक वेतन, प्रवास भत्ता, रजा व पेन्शन विक्री इ. इत्यादी धनराशीवर विलंबाच्या कालावधीत चक्रवाढ व्याज मिळणेबाबत.**

******

उपरोक्त विषयास अनुसरुन अर्जदार से.नि.पो.निरीक्षक, श्री. राजेंद्र सिंग शंकरसिंग परदेशी, यांचा दि.१६/०२/२०२४ च्या अर्जाची प्रत पुढील योग्य त्याकार्यवाहीकरीता सोबत जोडली आहे.

२. तरी पोलीस अधीक्षक, यांना विनंती करण्यात येते की, अर्जदार से.नि.पो.निरीक्षक, श्री. राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, यांच्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्देनिहाय परिपूर्ण तपशीलासह फेरप्रस्ताव या कार्यालयाच्या मार्फतीने शासनास सादर करावा.

Signed by KALPANA KISAN LOKHANDE
Date: 23-02-2024 17:48:28
R(कल्पना लोखंडे)

पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक
(नि.वे.)(अति.कार्य.)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

पोलीस अधीक्षक, जळगांव

प्रत,

विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

प्रत सविनय सादर.

श्री राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, से.नि. पोलिस निरीक्षक, जळगांव
रा.बी.टाईप,२/६,पोलीसअधिकारीवसाहत,स्नेहबंधनपार्क,
शरणपूर-रोड, नाशिक ४२२००२

दि. ०५/०८/२०२२

प्रति,
मा. पोलिस अधिक्षक सो,
जळगाव

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ०१

विषय - प्रवास भत्ता देयक मिळणेबाबत.

संदर्भ - आपलेकडील आदेश क्र.

१) क्र.८० / लेखा / प्रभ आग्रीम / २०२१ / ११५०८ जळगाव दि.८/११/२१
२) क्र. ५६ वि चौ-३ / पो.नि. मुक्ताई नगर /४२१ /२०१९ दि.०३/१०२०१९
३) मा.पो.उप अधिक्षक मुख्यालय जळगाव महोदयांकडील जा.क्र.४० / २०२०
दि. १५/०१/२०२०

रिपोर्ट - राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी सेवा-निवृत्त पोलिस निरीक्षक जळगाव महाराष्ट्र रा. बी टाईप २/६ स्नेहबंधन पार्क, पोलिस अधिकारी वसाहत, शरणपूर रोड नाशिक मो. क्र . ८८८८८७२९२९

मा. महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भान्वये आम्ही खालील नमूद ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा बंदोबस्त केलेला असून त्याचे देयक मिळणेस विनंती.

| अ. क्र | प्रवास | दिनांक | बंदोवस्त |
|---|---|---|---|
| १ | जळगाव ते भुसावळ | ०२/०९/२०१९ ते १३/०९/२०१९ | गणपती बंदोवस्तासाठी मा. उपविभागीय अधिकारी भुसावळ यांच्या अधिनस्त |
| २ | जळगाव ते नागपूर | १३/१२/२०१९ ते १४/१२/२०१९ | हिवाळी अधिवेशन नागपूर |
| ३ | जळगाव ते शिर्डी | १७/०१/२०२० ते २९/०५/२०२० | शिर्डी जि.अहमदनगर |

तसेच आपल्याकडील आदेश क्र. १३९ / ३६३ सी.बी.- २ / से.नि.पो.आ.जळगाव / २०२० दि. २८/०५/२०२० अन्वये नियम वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने स्वग्राम जाण्यासाठी सुमारे ३० हजार वाहन भाडे त्यात आकारून उपरोक्त प्रवास भत्ता बील वेळोवेळी मागणी करूनही अदयाप पर्यंत मिळालेले नाही.

तसेच संदर्भ क्र. १ अन्वये आपणाकडून हिवाळी अधिवेशनासाठी २००० रूपये आग्रीम देण्यात आले होते ते सदर देयकातून कमी करून उर्वरीत रक्कम तात्काळ मिळणेस विनंती.

मा.सविनय सादर

राजेंद्रसिंग श. परदेशी
पोलीस निरीक्षक - सेनि. - महाराष्ट्र

आवक शाखा, विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक
दिनांक :- ८/८/२०२२
वेळ :- ११ ३८

आवक लिपीक, आवक शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय जळगांव

माहितीस्तव -

१. मा.पोलिस महासंचालक सो मरा. मुंबई
२. मा.विशेष पोलिस महानिरीक्षक सो नाशिक परिक्षेत्र

# Annexure E



**महाराष्ट्र शासन**
गृह विभाग,
नविन प्रशासन भवन, १२ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

दूरध्वनी क. २२०२८१६६ Email ID: home_hdo१@maharashtra.gov.in

क्रमांक : विप्रव्या०४२३/प्र.क्र.१३३/आस्था-१ दिनांक : २ मे, २०२३.

प्रति,

पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- **विलंबाने प्रदान उपदान, भविष्य निर्वाह निधी व गट विमा योजनेच्या रकमेवर व्याज मिळणेबाबत,**
**श्री. राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी, सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक.**

संदर्भ:- आपले पत्र, क्रमांक पोमसं/३९/४२/चक्रवाढ व्याज मिळणेबाबत/सेनि पो.नि.परदेशी/१८३/२०२२, दि. १६/०२/२०२३.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाधिन प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाचे अवलोकन केले असता, श्री. राजेंद्रसिंग शंकरसिंग परदेशी हे दि. ३१/०५/२०२० रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. श्री. परदेशी यांच्या गट विमा बचत निधी व भविष्य निर्वाह निधी मधील रक्कम कोषागार कार्यालयातर्फे अनुक्रमे दि. २२/०७/२०२० रोजी व दि. ०९/११/२०२० रोजी पारित करण्यात आली आहे. सदर रकमा श्री. परदेशी यांस अदा करण्यात आल्याचे दिनांक सदर प्रस्तावात दिसुन येत नाही. श्री. परदेशी यांनी केलेल्या दि. १३/१२/२०२२ रोजी केलेल्या अर्जामध्ये, त्यांस गट विमा बचत निधीची रक्कम सप्टेंबर, २०२० मध्ये म्हणजेच ४ महिने उशीरा, भविष्य निर्वाह निधी मधील रक्कम नोव्हेंबर, २०२० मध्ये म्हणजेच ६ महिने उशीरा प्राप्त झाल्याचे नमुद केले आहे.

श्री. परदेशी यांस गट विमा बचत निधी रक्कम ३ महिन्यानंतर अदा करण्यात आल्याने सदर विलंब हा प्रशासकीय करणांमुळे झाला किंवा कसे? तसेच, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक: गवियो-१०९२/प्र.क्र.२/९२/लेपवि, दि.२७/०५/१९९२ च्या अनुषंगाने व विलंबाने प्रदान केलेल्या उपदानावरील व्याज अदा करण्याच्या अनुषंगाने वित्त विभाग शासन निर्णय, क्रमांक सेनिवे. १०९१/५५/सेवा-४, दि. ०६/०५/१९९१ च्या अनुषंगाने तपासुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पुन्हा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

श्री. परदेशी यांस भविष्य निर्वाह निधी ची रक्कम ६ महिने उशीरा अदा करण्यात आली आहे. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम मधील नियम १२ (४) नुसार त्यांना व्याज देय होते. श्री. परदेशी यांस महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा असलेली रक्कम त्यांच्या नियत सेवानिवृत्तीच्या दिनांकास देणे शक्य व्हावे याकरिता वर्गणीदाराच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी एक वर्ष अगोदर कार्यवाही सुरू करण्यात आली होती का? तसेच, महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी नियमामधील नियम १२(४) टिप (१) मधील तरतुदीनुसार श्री. परदेशी यांना भविष्य निर्वाह निधी प्रदान करण्यात झालेल्या

प क १४१/२०२३

विलंबाबाबतची कारणे तपासून त्यास वर्गणीदार जबाबदार आहे किंवा संबंधित अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहेत? याची खातरजमा करुन जर संबंधित अधिकारी/कर्मचारी जबाबदार असल्यास त्यांचेविरोधात कार्यवाही करुन अहवाल सादर करण्यात यावा.

तसेच, श्री. परदेशी यांस निवृत्तीनंतर कोणत्या कालावधीसाठी तात्पुरते सेवानिवृत्तीवेतन अदा करण्यात आले होते? व नियमित निवृत्तीवेतन कधीपासुन अदा करण्यात आले होते? याबाबत माहिती उपलब्ध करुन देण्यत यावी, ही विनंती.

आपला,

निर्गमित केले
दिनांक : २/२/२०२४
सही :

(हरेश्वर सहाणे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग.

# Annexure F

## STATEMENT OF ACCOUNT

**STATE BANK OF INDIA**
SHARANPUR ROAD BRANCH, NASHIK
CROWN COMPLEX, OPP RAJIV GANDHI BHAVAN
SHARANPUR ROAD NASHIK
422002
Branch Code :60431
Branch Phone :2572587
IFSC : SBIN0060431
MICR : 422002017
**Account No.:**39068740700 (Sr. Citizen)
**Product :** REGULAR SB CHQ-PENSIONERS
**Currency :** INR

**Name : Mr. RAJENDRASING SHANKARSING PARDESHI &Mrs PUSHPA PARDESHI**
2B TYPE BLDG., SNEHABANDHAN PARK,
POLICE HEAD QTRS, SHARANPUR ROAD,
NASIK
Nashik

**Date :** 19/01/2024 **Time :** 14:13:53
**Branch E-mail :** sbi.60431@sbi.co.in
**Cleared Balance :** 19,277.00Cr
**Uncleared Amount :** 0.00
**+MOD Bal :** 0.00
**Monthly Average Balance:** 0
**Limit :** 0.00
**Drawing Power :** 0.00
**E-mail :** rajupardeshi1961@gmail.com
**Int. Rate :** 2.70 % p.a.
**Nominee Name :**
**Account Open Date :** 14/01/2020
**Account Status :** OPEN
**Statement From :** 01/04/2022 **to** 30/06/2022
**Page No. :** 1

| Post Date | Value Date | Details | Chq.No | Debit | Credit | Balance |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **BROUGHT FORWARD :** | | | | 3847.00Cr |
| 21/04/22 | 21/04/22 | CEMTEX DEP Provisional pension | | | 44606.00 | 48453.00Cr |
| 22/04/22 | 22/04/22 | CEMTEX DEP LEAVE ENCASHMENT | | | 796770.00 | 845223.00Cr |
| 29/04/22 | 29/04/22 | CASH WITHDRAWAL SELF AT 60431 SHARANPUR R | | 45000.00 | | 800223.00Cr |
| 12/05/22 | 12/05/22 | CAS CHQ XFER WD by chq 405791 40503709154 OF Mrs. AT 01469 OLD AGRA RO | 405791 | 800000.00 | | 223.00Cr |
| 30/05/22 | 30/05/22 | CEMTEX DEP D C R G FINAL | | | 1123650.00 | 1123873.00Cr |
| 03/06/22 | 03/06/22 | CAS CHQ XFER WD TRF 40503709154 OF Mrs. AT 01469 OLD AGRA RO | 405792 | 1100000.00 | | 23873.00Cr |
| 03/06/22 | 03/06/22 | CASH WITHDRAWAL SELF AT 60431 SHARANPUR R | | 23000.00 | | 873.00Cr |
| 15/06/22 | 15/06/22 | CEMTEX DEP Pension | | | 107744.00 | 108617.00Cr |
| 15/06/22 | 15/06/22 | CEMTEX DEP Pension | | | 1368157.00 | 1476774.00Cr |
| 16/06/22 | 16/06/22 | DEP TFR TRF FR 0040856118557 TERM OF FD 0092D | | | 4875.00 | 1481649.00Cr |
| 16/06/22 | 16/06/22 | CAS CHQ XFER WD TRF 40503709154 OF Mrs. AT 01469 OLD AGRA RO | 405793 | 1450000.00 | | 31649.00Cr |
| 16/06/22 | 16/06/22 | CASH WITHDRAWAL SELF AT 60431 SHARANPUR R | | 30000.00 | | 1649.00Cr |
| 25/06/22 | 25/06/22 | INTEREST CREDIT | | | 1669.00 | 3318.00Cr |
| | | **CLOSING BALANCE :** | | | | 3,318.00Cr |

**Statement Summary**

| | | | |
|---|---|---|---|
| **Dr. Count 6** | **Cr. Count 7** | **34,48,000.00** | **34,47,471.00** |

In Case Your Account Is Operated By A Letter Of Authority/Power Of Attorney Holder, Please Check The Transaction With Extra Care.

***--- END OF STATEMENT ---***